ePaper
महापौर पदासाठी भाजपाचा नवा फॉर्म्यूला, एकनाथ शिंदेंचं टेन्शन वाढलं
| वर्ष - 9 | अंक -147 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज™

## आतील पानांत

- रिंकूवर होणार 'हनुमाना'चा कोप?
- बांग्लादेशमध्ये रमीझ राजाचा पोपट
- लोकांचा आवाज दाबला जातोय
- भंडाऱ्यात मंदिरातील मूर्तीची विटंबना !

www.mahaenews.com | मंगळवार, दि. 20 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## जि.प.; पं. स. निवडणूक: पुणे जिल्हा परिषदेच्या कारभाराची गोपनीय चौकशी सुरू

# फडणवीस–पवार पुन्हा आमने-सामने?

## महापालिकेनंतर आता जिल्हा परिषद रणांगण; भाजपकडून अजित पवारांना घेरण्याची तयारी

| पुणे |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीदरम्यान 'मैत्रीपूर्ण लढत' असल्याचे सांगत एकमेकांना आरसा दाखवणारे हे दोन्ही दिग्गज नेते आता जिल्हा परिषदेत मात्र थेट राजकीय संघर्षाच्या तयारीत असल्याचे चित्र आहे. भाजपने शिवसेनेच्या (शिंदे गट) मदतीने अजित पवारांना जिल्ह्यात घेरण्यासाठी हालचाली सुरू केल्या असून, पुणे जिल्हा परिषदेच्या कारभाराची गोपनीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.**




### महापालिकेतील वादळानंतर आता जिल्हा परिषद

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीदरम्यान अजित पवार यांनी भाजपवर जोरदार प्रहार करत प्रचाराला चांगलीच धार दिली होती. पुण्यातील 'त्रिकूट'वर, तर पिंपरी-चिंचवडमध्ये आमदार महेश लांडगे यांच्यावर थेट टीका करत पवारांनी प्रचारात रंगत आणली होती.

यावर प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पवार यांचं नाव न घेता, "काहींनी आधी आरसा पाहावा," अशी सूचक टीका केली होती.

मात्र, निकालानंतर दोन्ही महापालिकांमध्ये भाजपच दादा ठरला, तर राष्ट्रवादीला अपेक्षित यश मिळू शकलं नाही. याच पार्श्वभूमीवर आता भाजपकडून 'सव्याज परतफेड' करण्यासाठी जिल्हा परिषदेचं रणांगण निवडल्याचं राजकीय वर्तुळात बोललं जात आहे.

### जिल्हा परिषदेच्या कारभाराची गोपनीय चौकशी

भाजपने जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा परिषदेच्या कारभाराची गोपनीय चौकशी सुरू केली आहे. या चौकशीतील मुद्दे, त्रुटी आणि संभाव्य गैरव्यवहार प्रचारादरम्यान समोर आणून अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसला अडचणीत आणण्याची रणनीती आखली जात असल्याची चर्चा आहे.

## निवडणूक चुरशीची; फडणवीस-पवार संघर्ष केंद्रस्थानी

एकीकडे भाजप-शिवसेना युती, दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची शक्यता — या सगळ्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा परिषद निवडणूक अत्यंत चुरशीची होणार हे स्पष्ट आहे. महापालिकेनंतर आता जिल्हा परिषदेत फडणवीस-पवार संघर्ष केंद्रस्थानी राहणार, आणि याच संघर्षातून पुणे जिल्ह्याचं पुढील राजकीय चित्र ठरणार असल्याचं राजकीय विश्लेषक सांगत आहेत.

भाजपच्या स्थानिक नेत्यांच्या मते, "महापालिकेत आमच्यावर झालेले आरोप जिल्हा परिषदेत परतफेडीसह मांडले जातील," अशी स्पष्ट भूमिका घेतली जात आहे.

### ७३ गट, १४६ गण; पुणे जिल्ह्यात मोठं रणसंग्राम

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची घोषणा झाली असून, ७३ जिल्हा परिषद गट १४६ पंचायत समिती गण यासाठी निवडणूक होणार आहे. पुणे जिल्हा परिषदेचे एकूण ७३ सदस्य असून, या सर्व जागांवर भाजप-शिवसेना युतीकडून सक्षम आणि ताकदीचे उमेदवार देण्याची तयारी सुरू आहे.

### भाजप-शिवसेना युतीसाठी जोरदार हालचाली

या निवडणुकांसाठी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि माजी मंत्री विजय शिवतारे यांच्यात सातत्याने बैठका सुरू आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात जागावाटप, उमेदवार निवड आणि प्रचार यंत्रणा यावर चर्चा होत आहे.

भाजप-शिवसेना (शिंदे गट) युती अंतिम झाली, तर राष्ट्रवादी काँग्रेससमोर जिल्ह्यात मोठं आव्हान उभं राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. येत्या दोन दिवसांत या युतीची अधिकृत घोषणा होण्याची दाट शक्यता आहे.

### भाजपची 'ऑपरेशन मजबूत संघटन' रणनीती

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपने राजकीय ताकद वाढवण्यासाठी हालचाली तीव्र केल्या आहेत. याचाच भाग म्हणून, माजी आमदार संग्राम थोपटे,संजय जगताप, इंदापूरचे प्रदीप गारटकर यांचा भाजप प्रवेश करून घेण्यात आला आहे.
आमदार राहुल कुल यांच्याकडून या सर्व नेत्यांमध्ये समन्वय साधण्याचं काम सुरू असून, जिल्हाभर संघटन मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. या सर्व हालचालींना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं थेट पाठबळ असल्याचं बोललं जात आहे.

### अजित पवारांना जिल्ह्यात रोखण्याचा प्रयत्न

भाजप-शिवसेना युतीकडून पुणे जिल्ह्यात अजित पवार यांचं वर्चस्व कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. प्रचारात गोपनीय चौकशीचे मुद्दे, स्थानिक प्रश्न आणि विकासाच्या तुलनात्मक दाव्यांवर भर देण्याची रणनीती आखली जात आहे.

**काका-पुतणे पुन्हा एकत्र** राष्ट्रवादीच्या इच्छुकांची अजित पवारांनी घेतली परीक्षा

# पुन्हा राजकीय हालचालींना वेग!

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून, (POLITICAL NEWS) जिल्ह्यातील लढत दोन्ही राष्ट्रवादी विरुद्ध भाजप–शिवसेना अशी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. रविवारी पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून १०५ इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या. विशेष बाब म्हणजे या मुलाखतींच्या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार (AJIT PAWAR) उपस्थित होते. यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले.**

## कोणतीही अधिकृत माहिती नाही





बारामती लोकसभा मतदारसंघातील पुरंदर, दौंड, राजगड, मुळशी आदी तालुक्यांतील ३५ जिल्हा परिषद गट व ७० पंचायत समिती गणांसाठी इच्छुकांच्या मुलाखती दुपारी तीन वाजता सुरू झाल्या. या प्रक्रियेत स्थानिक राजकीय परिस्थिती, निवडणुकीतील ताकद, कार्यकर्त्यांचा पाठिंबा आणि जनसंपर्क याबाबत सखोल प्रश्न विचारण्यात आले. काही ठिकाणी इंदापूर तालुक्यातील मुलाखती स्वतंत्रपणे होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यास संदर्भ म्हणजे 'प्रिव्हेंशन ऑफ करप्शन ॲक्ट'मधील '१७-अ' या कलमाच्या वैधतेबाबत सर्वोच्च न्यायालयाचा विभागला गेलेला निर्णय. या कायद्यात २०१८ साली हे '१७-अ' कलम घुसवले गेले. एखाद्याविरोधात भ्रष्टाचाराची तक्रार असेल तर त्याची चौकशी करण्यासाठी संबंधितांस खात्यातील वरिष्ठांच्या परवानगीची गरज या कलमाने अपरिहार्य करण्यात आली. अशी परवानगी नसेल तर भ्रष्टाचाऱ्याची चौकशी करता येत नाही. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली गेली. तीवर निकाल देताना दोन न्यायाधीशांच्या पीठाचे यावर एकमत नसल्याचे दिसून आले आणि या प्रकरणी दोघांनी दोन निकाल दिले. यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे, सदरहू कायद्यात त्रुटी आहेत हे उभयतांस मान्य आहे. पण त्या दूर कशा केल्या जाव्यात याबाबत त्यांच्यात एकमत नाही. न्या. बी. व्ही. नागरत्ना यांनी या प्रकरणी तडफदार भूमिका घेत '१७-अ' कलम म्हणजे भ्रष्टाचाऱ्यास पाठीशी घालण्याचा प्रयत्न, असे म्हटले आणि ते रद्दबातल केले जावे अशी भूमिका घेतली. एखाद्यावर भ्रष्टाचाराचा वहीम असेल तर कशास हवी त्याच्या खात्यातील वरिष्ठांची परवानगी, असा त्यांचा प्रश्न. तो रास्त. कारण एकदा का अशी परवानगी अत्यावश्यक ठरवली की सदरहू भ्रष्ट आणि त्याचे खात्यातील वरिष्ठ यांच्यात साटेलोटे होऊन चौकशी नाकारली जाईल.

भ्रष्टाचाऱ्यांचे स्वत:चे असे हितसंबंधी वर्तुळ असते. 'सबका साथ, सबका विकास' हे त्यांचे तत्त्व. त्यामुळे हे सर्व एकमेकांना सांभाळत राहतील आणि पुढे काही होणार नाही, असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ. याआधी अन्य काही भ्रष्टाचार प्रकरणांत असेच प्रश्न निर्माण झाले होते. त्या त्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने अशी पूर्वपरवानगी अत्यावश्यक करण्याचे सर्व प्रयत्न फेटाळले. हे '१७-अ' प्रकरण त्याच जुन्या प्रकरणांचा नवा आविष्कार आहे. इतक्या नि:संदिग्धपणे सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात निकाल दिलेला असताना पुन्हा असा प्रयत्न करण्याचे कारण काय, असा त्यांचा प्रश्न.या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, "एकत्रितपणे निवडणूक लढविण्याच्या भूमिकेत असलेले काही इच्छुक कार्यकर्ते अजित पवार यांची भेट घेण्यासाठी आले होते. कार्यकर्त्यांच्या इच्छेनुसार काही तालुक्यांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढतील.

## एकत्रित रणनीतीचा प्रयोग

तर काही ठिकाणी वेगवेगळे पर्याय राहतील." विशेष म्हणजे, सर्व इच्छुकांना जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक 'घड्याळ' चिन्हावर लढावी लागू शकते, अशी शक्यता दक्षिण जिल्हाध्यक्षांनीही व्यक्त केली आहे. त्यामुळे महापालिकेप्रमाणेच ग्रामीण भागातही एकत्रित रणनीतीचा प्रयोग होऊ शकतो. दुसरीकडे, भारतीय जनता पार्टीनेही जिल्हा परिषद निवडणुकांसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे.

# प्रदूषणमुक्तीसाठी पुण्याचे मोठे पाऊल

## 'प्रोलॉग' रेसने सायकलिंग स्पर्धेचा दिमाखदार प्रारंभ

। पुणे ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पुणे शहराला प्रदूषणमुक्त बनवणे आणि सायकलिंग संस्कृतीला पुनरुज्जीवित करणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे," असे प्रतिपादन पीएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले. पुण्यात आजपासून सुरू झालेल्या 'बजाज पुणे ग्रँड सायकल टूर' च्या निमित्ताने त्यांनी 'नवराष्ट्र'शी संवाद साधला.**



गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या अथक परिश्रमानंतर आज या भव्य स्पर्धेचा बिगुल वाजला आहे. या स्पर्धेच्या नियोजनाबाबत जितेंद्र डुडी यांनी आमचे प्रतिनिधी निखील सुक्रे यांच्याशी सविस्तर बातचीत केली.ही स्पर्धा केवळ एका दिवसापुरती मर्यादित नसून, ती अत्यंत आव्हानात्मक असणार आहे:एकूण अंतर: ४०० किलोमीटरपेक्षा जास्त अंतराचा प्रवास सायकलस्वार पूर्ण करतील. जागतिक सहभाग: या स्पर्धेत देश-विदेशातील अव्वल दर्जाच्या सायकलस्वारांनी नोंदणी केली असून पुण्याला जागतिक सायकलिंग नकाशावर स्थान मिळवून देण्याचा हा प्रयत्न आहे. सहा महिन्यांची पूर्वतयारी: मार्गाची निवड, खेळाडूंची सुरक्षा आणि तांत्रिक बाबींसाठी प्रशासकीय पातळीवर गेल्या सहा महिन्यांपासून सूक्ष्म नियोजन सुरू होते.पुणे शहरात वाढत्या प्रदूषणावर सायकलिंग हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो, असा विश्वास डुडी यांनी व्यक्त केला. या मोठ्या आयोजनादरम्यान शिवाजीनगर आणि डेक्कन परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी चोख नियोजन केले आहे. खेळाडूंना कोणताही अडथळा येऊ नये आणि नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी स्वयंसेवक आणि पोलीस यंत्रणा सज्ज आहे.पुढील तीन दिवस पुण्याच्या रस्त्यांवर केवळ वेगच वेग नाही.

## सायकलिंग प्रेमींसाठी मेजवानी

या स्पर्धेत देशातील नामवंत १६५ सायकलस्वार सहभागी झाले आहेत. ही स्पर्धा 'टाईम ट्रायल' (TIME TRIAL) स्वरूपाची असल्याने, सर्व स्पर्धक एकाच वेळी न धावता प्रत्येकी १ मिनिटाच्या अंतराने स्पर्धेत उतरतील. वैयक्तिक वेगाची आणि वेळेची ही खरी कसोटी आज पुण्याच्या रस्त्यांवर पाहायला मिळणार आहे.या स्पर्धेचे खास वैशिष्ट्य म्हणजे 'टाईम ट्रायल' पद्धत. आज सहभागी होणारे १६५ सायकलस्वार एकाच वेळी न सुटता, प्रत्येक खेळाडू १ मिनिटाच्या अंतराने आपली रेस सुरू करेल. वैयक्तिक वेगाची कसोटी पाहणारी ही स्पर्धा सायकलिंग प्रेमींसाठी मोठी मेजवानी ठरणार आहे.

## ३२ पैकी १९ प्रभागांत क्रॉस वोटिंग
## माजी महापौर, ३ स्थायी समिती अध्यक्ष पराभूत

# पिंपरीत 'क्रॉस वोटिंग'चा भूकंप!

## १९ प्रभागांत पॅनेल कोसळले, माजी महापौरांसह दिग्गजांचा पराभव

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत 'क्रॉस वोटिंग'ने राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. तब्बल ३२ प्रभागांपैकी १९ प्रभागांत पॅनेल कोसळले असून, अनेक ठिकाणी एका-दोन जागांवरच पॅनेलमधील उमेदवार निवडून आले. या अनपेक्षित घडामोडींमुळे माजी महापौरांसह अनेक दिग्गज नगरसेवकांना पराभवाचा धक्का बसला आहे. सत्तेत एकत्र असलेल्या महायुतीतील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांनी महापालिका निवडणूक स्वतंत्रपणे लढविल्याने ही निवडणूक अधिक रंगतदार ठरली; मात्र अंतर्गत नाराजी आणि स्थानिक समीकरणांनी निकालाचे गणित पूर्णपणे बदलून टाकले.**



भाजपला सर्वाधिक ८४ जागांवर यश मिळाले, तर राष्ट्रवादी काँग्रेसला ३७ जागा मिळाल्या. शिवसेना (शिंदे) पक्षाला ६, तर एका अपक्ष उमेदवाराने बाजी मारली. एकूण १२८ नगरसेवक निवडून आले. मात्र या आकड्यांआड लपलेली खरी कथा म्हणजे क्रॉस वोटिंगमुळे झालेली मोठी उलथापालथ. भाजप आणि राष्ट्रवादी दोन्ही पक्षांत माजी नगरसेवकांची मोठ्या प्रमाणावर फोडाफोडी झाली. उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच अर्ज दाखल झाल्याने अनेक ठिकाणी नाराजी वाढली आणि त्याचा थेट परिणाम मतदानावर झाला.

चार सदस्यीय प्रभागांमध्ये अनेक ठिकाणी चार उमेदवार एकत्र प्रचार करताना दिसले. तरीही प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी 'पॅनेल टू पॅनेल' मतदान झाले नाही. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी सभांमधून "हातमिळवणी नको, संपूर्ण पॅनेल विजयी झाला पाहिजे" असा सज्जड दम दिला होता. पण स्थानिक पातळीवर भावकी-गावकी, मित्र-मैत्रिणी आणि वैयक्तिक राजकारण हावी ठरले. परिणामी मतदारांनी पक्षापेक्षा ओळखीला प्राधान्य दिल्याचे स्पष्ट झाले.

भाजपचे प्रभाग क्रमांक २, ३, ४, ६, १०, ११, १५, २५, २६ आणि २९ या दहा प्रभागांत संपूर्ण पॅनेल विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभाग क्रमांक ९, २० आणि २१ या तीन प्रभागांत पूर्ण पॅनेल निवडून आले. मात्र उर्वरित १९ प्रभागांत क्रॉस वोटिंग झाले. प्रभाग क्रमांक १, ५, ७, ८, १२, १३, १४, १६, १७, १८, १९, २२, २३, २४, २७, २८, ३०, ३१ आणि ३२ मध्ये पॅनेल अपयशी ठरले.

या क्रॉस वोटिंगचा सर्वात मोठा फटका अनुभवी नेत्यांना बसला. माजी महापौर उषा ढोरे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडिगेरी, संतोष लोंढे, सीमा सावळे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे यांच्यासह चंद्रकांत नखाते, जयश्री गावडे, मोरेश्वर शेंडगे, सिद्धेश्वर बारणे आणि रोहित काटे या माजी नगरसेवकांना पराभव पत्करावा लागला. अनेक वर्षे सत्ता आणि प्रशासनाचा अनुभव असतानाही स्थानिक नाराजी त्यांच्या आड आली.

काही प्रभागांत मात्र पॅनेल भेदून एकट्याने विजय मिळविण्याचे चित्र दिसले. भाजपचे संजय काटे, कैलास कुटे, सोनम मोरे, धर्मपाल तंतरपाळे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नाना काटे, पंकज भालेकर, अनंत कोऱ्हाळे, सविता आसवानी, भीमाबाई फुगे, संतोष कोकणे, सागर कोकणे, विराज लांडे, तुषार सहाणे, योगिता बारणे, दिप्ती कांबळे, उज्वला ढोरे आणि शिवसेना (शिंदे) पक्षाच्या सुलभा उबाळे यांनी वैयक्तिक ताकदीच्या जोरावर बाजी मारली. दरम्यान, प्रभाग ३२ सांगवीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयी उमेदवार उज्वला ढोरे यांची क्रॉस वोटिंग संदर्भातील कथित व्हिडीओ क्लिप समाजमाध्यमांवर व्हायरल झाली आहे. 'एक मत घड्याळाला द्या आणि उर्वरित तीन मते भाजपला करा' असे आवाहन केल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र, उज्वला ढोरे यांनी हे आरोप फेटाळले असून, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून अशा बनावट चित्रफिती तयार केल्या जात असल्याचा दावा केला आहे.या पार्श्वभूमीवर मिरवणूक काढल्याप्रकरणी राष्ट्रवादीच्या एका नगरसेवकाविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने राजकीय वाद आणखी चिघळला आहे. "सोबतच्या सहकाऱ्यांनी दगाफटका केला, याचे खेद वाटतो. उमेदवार निवडून आल्याचा आनंद आहे. याबाबत अंतिम निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार घेतील," असे अतुल शितोळे यांनी सांगितले.

एकूणच, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या या निवडणुकीने महायुतीतील अंतर्गत विसंवाद उघड केला असून, आगामी राजकीय रणनीतींसाठी हा निकाल महत्त्वाचा धडा ठरणार आहे.

### भाजप-राष्ट्रवादीतील फोडाफोडीचा फटका, राजकीय गणिते कोलमडली
### 'पॅनेल टू पॅनेल' प्रचार फसला
### क्रॉस वोटिंगची व्हिडीओ क्लिप व्हायरल


---

# ऑनलाइन जॉबच्या आमिषातून ३.७५ लाखांची फसवणूक

## पिस्तुल बाळगणाऱ्या तडीपार गुंडाला अटक; हिंजवडीत टेलिग्रामवरून सायबर फसवणूक

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

ऑनलाइन जॉब आणि हॉटेल रेटिंगचे टास्क देण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्यांनी एका तरुणीची तब्बल ३ लाख ७५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना १ ऑगस्ट ते ४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत ऑनलाईन माध्यमातून हिंजवडी टप्पा तीन परिसरात घडली. या प्रकरणी २६ वर्षीय तरुणीने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी टेलिग्राम ग्रुपवरील अज्ञात व्यक्ती तसेच संबंधित बँक खातेधारकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीला एका अज्ञात मोबाईल क्रमांकावरून व्हॉट्सअॅपवर "ऑनलाइन जॉब करणार का?" असा मेसेज आला होता. काम घरबसल्या आणि कमी वेळात चांगले पैसे मिळतील, असे आमिष दाखवण्यात आले. फिर्यादीने होकार दिल्यानंतर तिला एका टेलिग्राम ग्रुपमध्ये अॅड करण्यात आले. त्या ग्रुपमध्ये हॉटेल रेटिंग देण्याचे छोटे-छोटे टास्क देण्यात आले. सुरुवातीला काही रक्कम बँक खात्यात जमा करून आरोपींनी तिचा विश्वास संपादन केला.

विश्वास बसल्यानंतर आरोपींनी अधिक कमाईचे आमिष दाखवत जास्त पैसे गुंतवण्यास भाग पाडले. "तुमचे पैसे ट्रेडिंग अॅपमध्ये अडकले आहेत, ते काढण्यासाठी पुन्हा रक्कम भरावी लागेल," असे सांगत वेगवेगळ्या टप्प्यांत फिर्यादीकडून एकूण ३ लाख ७५ हजार रुपये उकळण्यात आले. पैसे परत न मिळाल्याने आणि संशय बळावल्यानंतर तरुणीने हिंजवडी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. सध्या पोलिसांकडून सायबर चोरट्यांचा शोध घेतला जात असून बँक खात्यांची तपासणी सुरू आहे.

दरम्यान, शहरात दुसऱ्या एका गुन्हेगारी प्रकरणात चिंचवड पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पुणे जिल्ह्यातून तडीपार केलेले असतानाही आदेशाचे उल्लंघन करून पिस्तुल आणि जिवंत काडतूस बाळगणाऱ्या एका तरुणाला चिंचवड पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई शनिवारी (१७ जानेवारी) रात्री चिंचवड रेल्वे स्टेशनजवळील मोकळ्या मैदानात करण्यात आली. पोलिसांनी अमर नानासाहेब चव्हाण (वय २७, रा. साठे कॉलनी, चिंचवड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई लवंगपुरी पुरी यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीला यापूर्वी पुणे जिल्ह्यातून एका वर्षासाठी तडीपार करण्यात आले होते. तडीपारीचा कालावधी संपण्यापूर्वीच तो शहरात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

संशयावरून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असता त्याच्याकडे सुमारे ५२ हजार रुपये किमतीची एक देशी बनावटीची पिस्तुल आणि एक जिवंत काडतूस बेकायदेशीररीत्या मिळून आले. आरोपीविरुद्ध शस्त्र कायदा तसेच तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास चिंचवड पोलीस करत आहेत.

सायबर गुन्हे आणि बेकायदेशीर शस्त्र बाळगण्याच्या घटनांमुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, नागरिकांनी ऑनलाइन व्यवहार करताना सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.




**महाराष्ट्रात विदेशी गुंतवणुकीचा ओघ वाढावा या दृष्टीने गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसला रवाना झाले. त्याच वेळी नीती आयोगाच्या 'निर्यात सज्जता निर्देशांक २०२४' या अहवालातील राज्यांच्या यादीत महाराष्ट्राने अव्वल क्रमांक पटकविला ही राज्यासाठी अभिमानाची बाब मानावी लागेल.**

# क्षमतेत अव्वल; प्रत्यक्षात कसे?



विदेशी गुंतवणुकीपाठोपाठ निर्यातक्षम राज्यांच्या यादीत महाराष्ट्र आघाडीवरील राज्य, हा राज्यासाठी बहुमानच. त्याबद्दल मुख्यमंत्री व त्यांच्या पथकाचे अभिनंदन. निर्यातीला चालना देण्यासाठी राज्ये कशा प्रकारे पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतात, निर्यात वाढावी म्हणून करण्यात येणारे खास प्रयत्न अशा विविध श्रेणींचा अभ्यास करून व तज्ज्ञांची मते जाणून घेत हा अहवाल तयार केला. 'निर्यात सज्जते'त महाराष्ट्राने ६८.०१ असे सर्वाधिक गुण प्राप्त करून अव्वल स्थान पटकावले. याआधी दोन वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेल्या अहवालात गुजरात पहिल्या क्रमांकावर होते. त्या स्थितीत आयोगाला पालट दिसला. व्यवसाय सुलभतेमध्ये (ईझ ऑफ डूईंग बिझनेस) अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र तळाला असताना निर्यात सज्जतेत केलेली प्रगती दिलासादायक आहे. या सज्जतेच्या क्षमता ओळखून सत्ताधारी आणि प्रशासनाने अधिक मेहनत घेतल्यास महाराष्ट्र उद्योग, व्यवसाय, विदेशी गुंतवणूक व त्यातून रोजगार निर्मितीत अधिक प्रगती करू शकतो. विदेशी गुंतवणूकदारांना राज्यात आकर्षित करण्याकरिता यंदा २० लाख कोटींपेक्षा अधिक गुंतवणुकीचे उद्दिष्ट आहे.

अहवाल कालावधीत (२०२२ ते २०२४) महाराष्ट्रातून ५ लाख ६३ हजार कोटी रुपयांच्या वस्तुमालाची एकूण निर्यात झाली. प्रत्यक्ष निर्यातीत ११ लाख २४ हजार कोटी रुपयांचा टप्पा गाठून गुजरात हेच पुन्हा पहिल्या क्रमांकावरचे राज्य ठरले आहे. नंतर तमिळनाडू (३.६४ लाख कोटी रु.) व कर्नाटक (२.२३ लाख कोटी रु.) यांचा क्रमांक लागतो. गुजरातमध्ये असलेल्या तेलशुद्धीकरण प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणावर इंधन निर्यात होते. त्यातून गुजरातमधून होणाऱ्या निर्यातीचा आकडा प्रचंड दिसतो. निर्यातक्षमतेत अव्वल स्थान मिळविले त्याबद्दल सत्ताधारी स्वतःची पाठ थोपटून घेतील; पण नीती आयोगाने मांडलेल्या वास्तवाची मुख्यमंत्री, उद्योगमंत्री तसेच संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने दखल घेणे तेवढेच आवश्यक आहे. महाराष्ट्रातून होणारी निर्यात दरवर्षी कमी कमी होत चालली आहे, याबद्दल नीती आयोगाने चिंता व्यक्त केली आहे. २०२२मध्ये सहा लाख कोटींपेक्षा अधिक असलेली निर्यात ७.३ टक्क्यांनी कमी होऊन ती ५ लाख ६३ हजार कोटींपर्यंत घटली. गुजरातमधील निर्यात वाढली. महाराष्ट्रातून जवाहिरे, दागिन्यांची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते; पण या क्षेत्रात मोठी घट झाली. त्याचा फटका राज्याच्या निर्यातीला बसला. देशाच्या एकूण निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा १५ ते १७ टक्के आहे. हे प्रमाण पुढील चार वर्षांत २० टक्के करण्यासाठी झटण्याचा सल्ला नीती आयोगाने दिला आहे. निर्यातीला चालना देणाऱ्या १० जिल्ह्यांच्या देशव्यापी यादीत राज्यातील मुंबई शहर व उपनगर आणि पुणे या तीनच जिल्ह्यांचा समावेश आहे. गुजरातमध्ये छोटी-मोठी ४२ बंदरे आहेत. महाराष्ट्रातून जेएनपीए (पूर्वीचे जेएनपीटी) व मुंबई या दोन बंदरांमधूनच निर्यात होते. त्यातही जेएनपीएत वाढलेली जहाजांची वर्दळ आणि त्यातून होणारा विलंब यामुळे खर्च वाढतो. वाढवण बंदरातून मालवाहतूक सुरू होण्यास किमान पाच वर्षे लागतील. या अहवालात नीती आयोगाने उद्योगांमधील वास्तवाबाबत राज्याचे कान टोचले आहेत व त्याची राज्यकर्त्यांनी दखल घेत सुधारणा करणे अपेक्षित आहे. जमिनीचे वाढीव दर, मालाची ने-आण करण्याचा अधिकचा खर्च तसेच विजेचे महागडे दर यामुळे महाराष्ट्राला फटका बसल्याचे निरीक्षण या अहवालात नोंदवण्यात आले. राज्यात पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध असूनही खर्च अधिक असल्याने काही उद्योग महाराष्ट्राबाहेर गेले वा जाण्याच्या तयारीत आहेत हा धोकाही नीती आयोगाने निदर्शनास आणून दिला आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात उद्योगांची वीज महागडी आहे, याकडे उद्योजकांच्या संघटनांकडून वारंवार लक्ष वेधले जाते. विजेचे दर आम्ही कमी करू एवढेच मोघम आश्वासन दिले जाते.

## प्रासंगिक »

### सतराशे लुगडी

***भ्रष्टाचारामागील कारण नाही. तर अतिनियम; पण प्रामाणिक अंमलबजावणीची बोंब हे आपले दुखणे आहे...***

भारतीय प्रजासत्ताकास येत्या २६ जानेवारीस ७६ वर्षे पूर्ण होतील. या काळात ज्या काही समस्यांचे काय करायचे हे आपणास अजिबात आकळलेले नाही त्यातील एक म्हणजे भ्रष्टाचार.

ही संज्ञा प्राधान्याने सरकारी सेवेतील कर्मचाऱ्यांबाबत वापरली जाते. सरकारी पदामुळे आपणास मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर करून व्यक्तिगत, संस्थात्मक फायदा मिळवणे म्हणजे भ्रष्टाचार अशी सोपी व्याख्या केल्यास ही संज्ञा खासगी क्षेत्रास तितकी का लागू होत नाही, हे लक्षात यावे.

या देशात त्याविरोधात इतकी आंदोलने झाली; पण भ्रष्टाचार आहे तिथेच आहे. महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे यांनी शरद पवार यांच्या कथित भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन छेडले. ट्रकभर पुरावे देणाऱ्या गो. रा. खैरनार-नामे एका भंपक अधिकाऱ्यांचे त्यास साहाय्य झाले. पुढे काही नाही.

ताज्या महापालिका निवडणुकांत अपेक्षेप्रमाणे भाजपने यश मिळवले, हे दिसलेच. राज्यात एकूणच विरोधी पक्ष विविध कारणांनी ढेपाळलेले आणि मुंबईत विरोधी पक्षीय बनू पाहणाऱ्या ठाकरे बंधूंची दिशा चुकलेली. त्यामुळे भाजपस म्हणावे तसे आव्हान कोठेच उभे राहिले नाही.

# आता तेवढे विकासाचे पाहा!



लातूर, परभणी वा कोल्हापुरात जे काही दिसते ते अगदीच अपवाद. ते निर्माण झाले कारण त्या त्या शहरांत अजूनही काँग्रेसचे स्थानिक नेतृत्व उभे आहे म्हणून. म्हणजे जेथे जेथे काँग्रेस वा विरोधी पक्षीय नेत्यांनी सातत्याने काम केले तेथे जनतेने त्यांना साथ दिली. हा धडा ज्याप्रमाणे काँग्रेस श्रेष्ठीनामक अस्तित्वाने अदृश्य; पण परिणामांत दृश्य अशा घटकाविषयी आहे तितकाच तो मुंबईत राज आणि उद्धव ठाकरे यांच्यासाठीही आहे. पर्याय आपण देऊ शकतो हा विश्वास जोपर्यंत मतदारांत एखादा पक्ष निर्माण करू शकत नाही तोपर्यंत जनता त्यांस साथ देत नाही, हा अलीकडचा इतिहास. त्याचीच पुनरावृत्ती या निवडणुकांतही दिसून आली. सबब ठाकरे असोत वा अन्य कोणी. त्यांनी मुख्य विषयाकडे वळावे आणि अंग झटकून कामास लागावे. उगाच निवडणूक आयोगादी सरकारी यंत्रणांच्या नावे गळे काढू नयेत आणि मराठी माणसावर अन्याय वगैरेही टाहो फोडू नयेत. जे जिंकले त्यातही प्राधान्याने मराठी आहेत आणि ठाकरे बंधूंस मत देणाऱ्यांत अमराठीही आहेत. तेव्हा समोरचा कष्ट करताना दिसला तर(च) त्याचे रडणे गांभीर्याने घेतले जाते. कष्टाखेरीजच्या रडण्यास कांगावा असे म्हणतात.

मतदार तो ओळखतात. तो टाळून खऱ्या मुद्द्यांस भिडावयाचे असेल तर आपल्या शहरांच्या अंतरंगात डोकावावे. कोणत्याही शहरांतील रस्त्यांवरच्या खड्ड्यांच्या संख्येशी स्पर्धा करतील इतके मुद्दे आपल्या नगरांत आढळतील. स्मार्ट सिटी हा त्यापैकी एक. केंद्र सरकारने बराच मोठा गाजावाजा करून ही योजना हाती घेतली. महाराष्ट्रातील आठ प्रमुख शहरांचा अंतर्भाव या योजनेत आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, ठाणे, सोलापूर, कल्याण डोंबिवली इत्यादी. या सर्व शहरांत भाजप आणि ठाण्यात भाजपचा साथीदार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा विजय झाला. या शहरांत विरोधकांनी स्मार्ट सिटी योजनेचे काय झाले हा प्रश्न तरी उपस्थित केला काय? ही सर्व शहरे स्मार्ट होणे राहिले दूर, पण त्यातील जगण्याचा दर्जा होता त्यापेक्षा खाली गेला. या शहरांतील हवामान, वाहतूक, सार्वजनिक आरोग्य इत्यादी किती प्रश्नांस विरोधकांनी हात घातला. या सर्व शहरांतील रस्ते दिव्य म्हणावेत असे. अपवाद अर्थातच नागपूर या एका शहराचा. पण बाकी सर्वत्र आनंदीआनंदच. त्या शहरांतील रस्त्यांच्या दुरवस्थेचा मुद्दा धसास लावण्यासाठी विरोधकांनी काय केले? यातील ठाणे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अंगण. त्यांचा कंत्राटदार सोस सर्वच जाणतात. त्यापायी या शहरात नको इतकी कामे काढली गेली आणि ती रेटण्यासाठी शेकडो वृक्षांचीही हत्या झाली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## चुकांत सुधारणा करू — निवडणूक निकालांवर भुसेंची भर सभेत कबुली

# मी चुकलो काही ठिकाणी कमी पडलो

## मतदारांचे आभार व्यक्त करतो

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**"मी मतदारांचे आभार व्यक्त करतो. अर्थात आणखी आशिर्वादाची अपेक्षा होती. दुर्दैवाने आपले काही उमेदवार निवडून येऊ शकले नाहीत. मी समजतो की कदाचित, माझ्या नियोजनात काही कमतरता झाली असेल म्हणून काही ठिकाणी आपल्याला अपयश आले, अशी कबुली दादा भुसे यांनी आज नाशिकमधील बैठकीत दिली. या निवडणुकीत अनेक उमेदवार उभे राहण्यासाठी ते इच्छुक होते, त्यांची तयारी होती पण, काही उमेदवारांना यावेळी थांबावे लागले, त्या उमेदवारांचे मी आभार मानतो. त्या उमेदवारांनी माघार घेऊन उमेदवारांचे प्रचार केले, असेही भुसे म्हणाले.**



नाशिक महापालिकेच्या निवडणूक निकालांवर प्रतिक्रिया देताना मंत्री दादा भुसे यांनी निकाल स्वीकारण्याची भूमिका स्पष्ट केली. नाशिक महापालिकेत शिवसेनेचे २६ नगरसेवक निवडून आले असून, सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचे त्यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. या संदर्भात पक्षाची बैठकही पार पडल्याचे त्यांनी सांगितले.निश्चितपणे आम्हाला अधिक आशीर्वाद मिळतील अशी अपेक्षा होती. मोठ्या प्रमाणात नगरसेवक निवडून येतील, अशी खात्री होती. मात्र जनता जनार्दनाने जो निर्णय दिला आहे, तो स्वीकारावा लागतो. अपेक्षित यश मिळाले नाही म्हणून कोणावर बोट दाखवणार नाही. मी निकाल स्वीकारणारा कार्यकर्ता आहे. झालेल्या चुका आम्ही नक्कीच सुधारू आणि पूर्ण अभ्यास करूनच पुढील भाष्य करू," असे दादा भुसे म्हणाले. आकडेवारी सर्वांसमोर असून त्यावरच पुढील निर्णय घेतले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.महापालिकेत विरोधी बाकावर बसण्याबाबत विचारले असता, दादा भुसे म्हणाले की, "या संदर्भात अंतिम निर्णय एकनाथ शिंदे घेतील. त्यांना जे योग्य वाटेल, तेच निर्णय घेतला जाईल."मालेगाव महा पालिकेतील सत्तास्थापनेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, आकडेवारी जगजाहीर आहे. "मालेगावच्या दृष्टिकोनातून आणि शिवसेनेच्या भूमिकेतून जो निर्णय योग्य असेल, तो शिंदे साहेब घेतील. मालेगावमध्ये शिवसेना प्रमुख पक्ष असून सुमारे २० नगरसेवक आहेत. वरिष्ठांच्या कानावर सर्व बाबी घालून निर्णय घेतला जाईल. हिंदुत्वाच्या विषयात कोणतीही तडजोड होणार नाही. आम्ही शिवसेनेला पाठिंबा देण्याची भूमिका मांडू शकतो," असे त्यांनी स्पष्ट केले.मुंबई महापालिकेतील सत्तास्थापनेबाबत बोलताना दादा भुसे म्हणाले की, "मुंबईत प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार आणि परिस्थितीनुसार संवाद साधून योग्य तो निर्णय घेतला जाईल."ठाकरे गटाच्या शिवसेना नगरसेवकांच्या नॉटरीचेबलबाबत विचारले असता, "याबाबत मला कोणतीही माहिती नाही," असे दादा भुसे यांनी सांगितले. शिवसेनेच्या एकूण कामगिरीवर भाष्य करताना दादा भुसे म्हणाले की, "जनता जनार्दनाने तोलामोलाचा कौल दिला असला तरी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेवर शिक्कामोर्तब केले आहे.जिल्हा परिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून, तिथेही शिंदे यांच्या शिवसेनेवरच शिक्कामोर्तब होईल.'लाडकी बहीण' योजनेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, "एकनाथ शिंदे यांनी योजनेबाबत आश्वस्त केले आहे. पूर्वीचेच निकष लागू राहतील. पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळेल. मोठ्या प्रमाणावर ई-केवायसी पूर्ण झाली आहे. स्वीकृत नगरसेवकांच्या लॉबिंगविषयी बोलताना दादा भुसे म्हणाले, "जिथपर्यंत शिवसेनेचा विषय आहे, तिथे घोडेबाजार होणार नाही. सामान्य कार्यकर्त्यांना निवडणुकीत संधी दिली जाते.

### हिंदुत्वावर तडजोड नाही

स्वीकृत नगरसेवकांबाबत अभ्यास करूनच निर्णय घेतला जाईल. अपेक्षा असणे चुकीचे नाही, मात्र संख्या आणि निकष पाहूनच पुढे जाणार आहोत.नाशिक महापालिकेच्या निवडणूक निकालांवर प्रतिक्रिया देताना मंत्री दादा भुसे यांनी निकाल स्वीकारण्याची भूमिका स्पष्ट केली. नाशिक महापालिकेत शिवसेनेचे २६ नगरसेवक निवडून आले असून, सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचे त्यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

# भंडाऱ्यात मंदिरातील मूर्तीची विटंबना !

## आरोपीला अटक करा, संतप्त ग्रामस्थ धडकले पोलिस ठाण्यावर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पवनी तालुक्यातील भावड येथील जागृत मंदिरातील मूर्तीची विटंबना केल्याचा प्रकार शनिवारी सकाळी उघडकीस येताच भावड गावासह पंचक्रोशीतील भाविकांनी घटनास्थळी अलोट गर्दी केली होती. करण्यासाठी पोलिस प्रशासनाला २४ तासांची मुदत दिल्यानंतर रविवारी १८ जानेवारीला सकाळी ११ भावड येथून शेकडो ग्रामस्थ हजारोंच्या संख्येने अड्याळ पोलिस ठाण्यावर धडकले.**

भावड ते कोंढा कोसरा मार्गे अड्याळ १२ किलोमीटरचे अंतर कापत जन आक्रोश मोर्चा अड्याळ पोलिस ठाण्याजवळ धडकला. यावेळी रास्ता रोको आंदोलनाला सुरुवात झाली. यावेळी प्रामुख्याने आमदार नरेंद्र भोंडेकर, मंदिराचे अध्यक्ष प्रमोद मेंढे, समिती पदाधिकारी, माजी जिल्हा परिषद सदस्य रेखा भुसारी, देवेंद्र हजारे, किशोर पंचभाई, रविकिरण भुसारी, भावड परिसरासह सामाजिक कार्यकर्ता, पदाधिकारी महिला ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी आरोपीला न पकडल्यास जिल्हा मुख्यालयी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. मोर्चा अड्याळ येथे दाखल होताच गर्दी वाढली.पोलिस ठाण्यासमोर येताच आंदोलकांनी घडलेल्या अप्रिय घटनेचे दुःख व आक्रोश व्यक्त केला.



पोलिस प्रशासनाला २४ तासांची वेळ देऊनसुद्धा आरोपीला अटक करू शकले नाही, त्यामुळे आम्ही हा पवित्रा घेतला. या आधी दोनदा घटना अशाच घडल्या. त्यातही आरोपींचा शोध नाही. कुणाचीही भावना दुखावता कामा नये म्हणून आंदोलकांनी संयम ठेवा न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट मत आमदार भोंडेकर यांनी व्यक्त केले.अड्याळ पोलिस स्टेशन समोर आंदोलन धडकताच आंदोलकांनी काही काळ रस्ता अडवून धरून हर हर महादेवची घोषणा दिली. आरोपीला अटक झालीच पाहिजे नाही तर भावड ते भंडारा असा भाविकांचा मोर्चा जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयावर आणू, असे सांगितले. त्यानंतर पोलिस स्टेशन अड्याळ कक्षात अप्पर पोलिस अधीक्षक नीलेश मोरे हे व आमदार भोंडेकरसह शिष्टमंडळ बैठक पार पडली. या घटनेमुळे गावातील तथा पंचक्रोशीतील समस्त भाविकांच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. पोलिस अधीक्षकासमोर पोलिस प्रशासनाचा निषेध केला. आंदोलकांना धमकावण्यापेक्षा आरोपींचा शोध घ्यावा, असेही मत व्यक्त केले.

### हर हर महादेवची घोषणा

कुणाचीही भावना दुखावता कामा नये म्हणून आंदोलकांनी संयम ठेवा न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट मत आमदार भोंडेकर यांनी व्यक्त केले.अड्याळ पोलिस स्टेशन समोर आंदोलन धडकताच आंदोलकांनी काही काळ रस्ता अडवून धरून हर हर महादेवची घोषणा दिली.

धोरणात्मक निर्णय

## द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासाठी धोरणांवर चर्चा

# यूएई राष्ट्राध्यक्ष भारतात का आले?

## हितसंबंधांवर विचारांची देवाणघेवाण

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांचे सोमवारी भारतात आगमन झाले. त्यांच्या या दोन तासांच्या अल्पशा पण अत्यंत महत्त्वपूर्ण दौऱ्याने जागतिक राजकारणात चर्चेला उधाण आले आहे. मित्रत्वाचे नाते जपण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रोटोकॉल बाजूला सारत स्वतः विमानतळावर जाऊन त्यांचे जंगी स्वागत केले.**




विमानतळावर दोन्ही नेत्यांनी एकमेकांना प्रेमाने मिठी मारली, जे दोन्ही देशांमधील घट्ट मैत्रीचे प्रतीक मानले जात आहे. विशेष म्हणजे, स्वागतानंतर दोन्ही नेते एकाच कारमधून विमानतळावरून मुक्कामाच्या ठिकाणाकडे रवाना झाले. राष्ट्राध्यक्ष शेख अल नाहयान दुपारी ४:३० च्या सुमारास दिल्लीत पोहोचले आणि पंतप्रधान मोदींसोबतची त्यांची महत्त्वाची चर्चा ४:४५ वाजता सुरू झाली.युएई राष्ट्राध्यक्षांचा हा दौरा अशा वेळी होत आहे, जेव्हा पश्चिम आशियात मोठ्या घडामोडी घडत आहेत. भारताला नुकतेच 'गाझा बोर्ड ऑफ पीस'मध्ये सहभागी होण्याचे आमंत्रण मिळाले आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला करण्याचा धोका टळला असून, अशा संवेदनशील काळात ही भेट महत्त्वपूर्ण ठरत आहे. शेख अल नाहयान अध्यक्ष झाल्यानंतरचा त्यांचा हा तिसरा आणि गेल्या दशकभरातील पाचवा भारत दौरा आहे.गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही देशांमधील उच्चस्तरीय संवाद वाढला आहे. ४ जानेवारी रोजी लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी यूएईचा दौरा केला, तर डिसेंबरमध्ये परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनीही द्विपक्षीय बैठकीत सहभाग घेतला होता. सध्या यूएई हा भारतातील सातवा सर्वात मोठा गुंतवणूकदार असून, २००० सालापासून त्यांनी २२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे. पंतप्रधान मोदींच्या निमंत्रणावरून झालेली ही धावती भेट केवळ दोन तासांची असली, तरी ती भारत-यूएई संबंधांना एका नवीन उंचीवर नेणारी ठरेल, असा विश्वास परराष्ट्र मंत्रालयाने व्यक्त केला आहे. संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांचे सोमवारी भारतात आगमन झाले. त्यांच्या या दोन तासांच्या अल्पशा पण अत्यंत महत्त्वपूर्ण दौऱ्याने जागतिक राजकारणात चर्चेला उधाण आले आहे. मित्रत्वाचे नाते जपण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रोटोकॉल बाजूला सारत स्वतः विमानतळावर जाऊन त्यांचे जंगी स्वागत केले.विमानतळावर दोन्ही नेत्यांनी एकमेकांना प्रेमाने मिठी मारली, जे दोन्ही देशांमधील घट्ट मैत्रीचे प्रतीक मानले जात आहे. विशेष म्हणजे, स्वागतानंतर दोन्ही नेते एकाच कारमधून विमानतळावरून मुक्कामाच्या ठिकाणाकडे रवाना झाले. राष्ट्राध्यक्ष शेख अल नाहयान दुपारी ४:३० च्या सुमारास दिल्लीत पोहोचले आणि पंतप्रधान मोदींसोबतची त्यांची महत्त्वाची चर्चा ४:४५ वाजता सुरू झाली. युएई राष्ट्राध्यक्षांचा हा दौरा अशा वेळी होत आहे, जेव्हा पश्चिम आशियात मोठ्या घडामोडी घडत आहेत. भारताला नुकतेच 'गाझा बोर्ड ऑफ पीस'मध्ये सहभागी होण्याचे आमंत्रण मिळाले आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला करण्याचा धोका टळला असून, अशा संवेदनशील काळात ही भेट महत्त्वपूर्ण ठरत आहे. शेख अल नाहयान अध्यक्ष झाल्यानंतरचा त्यांचा हा तिसरा आणि गेल्या दशकभरातील पाचवा भारत दौरा आहे.गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही देशांमधील उच्चस्तरीय संवाद वाढला आहे. ४ जानेवारी रोजी लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी यूएईचा दौरा केला, तर डिसेंबरमध्ये परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनीही द्विपक्षीय बैठकीत सहभाग घेतला होता. सध्या यूएई हा भारतातील सातवा सर्वात मोठा गुंतवणूकदार असून, २००० सालापासून त्यांनी २२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे.

### लष्करी संबंध अधिक मजबूत

ती भारत-यूएई संबंधांना एका नवीन उंचीवर नेणारी ठरेल, असा विश्वास परराष्ट्र मंत्रालयाने व्यक्त केला आहे.संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांचे सोमवारी भारतात आगमन झाले. त्यांच्या या दोन तासांच्या अल्पशा पण अत्यंत महत्त्वपूर्ण दौऱ्याने जागतिक राजकारणात चर्चेला उधाण आले आहे.

# लोकांचा आवाज दाबला जातोय!

## राहुल गांधी यांनी भाजपआणि संघावर तीव्र टीका केली

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केरळमधील कोच्ची येथे आयोजित काँग्रेसच्या महापंचायतीत राहुल गांधी यांनी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तीव्र टीका केली. राहुल गांधी म्हणाले की, BJP आणि RSS सत्तेचे केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न करत आहेत, तर काँग्रेस पक्षाचा मूलभूत विचार सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित आहे.**

राहुल गांधी यांनी आरोप केला की, भाजपच्याच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार लोकांचा आवाज दाबून काही मोजक्या कॉर्पोरेट घराण्यांना फायदा करून देत आहे. भाजपला देशातील लोकांनी शांत राहावे असे वाटते आणि केवळ निवडक कॉर्पोरेट घराण्यांनी प्रगती करावीत, अशी त्यांची भूमिका असल्याचा आरोप त्यांनी केला.महापंचायतीला संबोधित करताना राहुल गांधी यांनी केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेस आणि UDF (युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट) ला मिळालेल्या यशाबद्दल कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका, सर्व स्तरांवर



काँग्रेसने उत्तम कामगिरी केली आहे. पंचायती हा लोकशाहीचा तिसरा आणि सर्वात मजबूत पाया आहे. संविधानाचे संरक्षण करायचे असेल, तर पंचायती आणि नगरपालिकांचे संरक्षण करावे लागेल.राहुल गांधी यांनी आठवण करून दिली की, 73वी आणि 74वी घटनादुरुस्ती काँग्रेस पक्षानेच आणली, ज्यामागे एक व्यक्ती, एक मत आणि प्रत्येक भारतीयाला देशाच्या कारभारात आवाज मिळावा, ही भूमिका होती. मी पूर्ण खात्रीने सांगतो, केरळच्या लोकांचा आवाज कोणीही दाबू शकत नाही. येणाऱ्या विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये केरळचे लोक आपला आवाज ठामपणे व्यक्त करतील.राहुल गांधी म्हणाले की, कोणतेही सरकार यशस्वी व्हायचे असेल, तर नेतृत्व लोकांपर्यंत सहज पोहोचणारे आणि नम्र असावे. नेतृत्व लोकांमध्ये मिसळले पाहिजे. केरळच्या लोकांच्या आवाजाचे खरे प्रतिनिधित्व करणारे नेतृत्व UDF आणि काँग्रेस देईल, याची मला खात्री आहे. दरम्यान, ही महापंचायत केरळ प्रदेश काँग्रेस कमिटी कडून आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात 15,000 पेक्षा जास्त निर्वाचित काँग्रेस प्रतिनिधी सहभागी झाले होते.

### नेतृत्व लोकांशी जोडलेले असावे


केरळमधील कोच्ची येथे आयोजित काँग्रेसच्या महापंचायतीत राहुल गांधी यांनी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तीव्र टीका केली. राहुल गांधी म्हणाले की, BJP आणि RSS सत्तेचे केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न करत आहेत, तर काँग्रेस पक्षाचा मूलभूत विचार सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित आहे.

# अरिजीत सिंहने गायलं 'जीव रंगला' गाणं, व्हिडीओ झाला व्हायरल

संगीत विश्वातील सध्याचं आघाडीचं नाव म्हणजे अरिजीत सिंह. अरिजीतने आपल्या सुमधूर आवाजाने तरुणाईला अक्षरशः वेड लावलं आहे. त्यामुळेच अरिजीतचा मोठा चाहता वर्ग आहे. त्याचं कुठलंही गाणं असो ते सुपरहिट होतंच. अरिजीत त्याच्या गाण्यांव्यतिरिक्त लाइव्ह कॉन्सर्टमुळे खूप चर्चेत असतो.

त्याच्या लाइव्ह कॉन्सर्टला चाहते तुफान गर्दी करतात. नुकताच पुण्यातील एमसीए इंटरनॅशनल स्टेडियमध्ये अरिजीत सिंहचा लाइव्ह कॉन्सर्ट पार पडला. या कॉन्सर्टमधील सध्या अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. विशेष म्हणजे पुण्यातील कॉन्सर्टमध्ये अरिजीत सिंहने मराठी गाणं गायलं; ज्याचा व्हिडीओ सध्या खूप चर्चेत आला आहे.

या व्हिडीओमध्ये अरिजीत सिंह मराठी गाणं गाताना दिसत आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेता 'जोगवा' चित्रपटातील 'जीव रंगला' ( JEEV RANGLA ) गाणं अरिजीत सिंहने गाताना पाहायला मिळत आहे. अरिजीतच्या




गोड आवाजात 'जीव रंगला' गाणं ऐकून अनेकांच्या अंगावर शहारे आले, अशा प्रतिक्रिया उमटल्या आहेत.अरिजीत सिंहचा हा व्हिडीओ १.८ मिलियनहून अधिक जणांनी पाहिला आहे.

या व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रियांचा पाऊस पडला आहे. एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, "म्हणून अरिजीत सिंह खूप उत्कृष्ट गायक आहे." दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "मराठी गाणं खूप छान गातो. गहिवरून आलं." तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "काय आवाज आहे आणि जबरदस्त." चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं की, मराठी गाणं गाऊन लोकांची मनं जिंकली. दरम्यान, याआधीही अरिजीत सिंहने लाइव्ह कॉन्सर्टमध्ये मराठी गाणी गायली होती. तेव्हादेखील त्याने आपल्या गोड आवाजाने चाहत्यांची मनं जिंकली होती. अरिजीत सिंह जसा सध्या मराठी गाणं गायल्यामुळे चर्चेत आला आहे. तसाच सध्या दुसऱ्या बाजूला पंजाबी प्रसिद्ध गायक हनी सिंगदेखील चर्चेत आला आहे.

## गौरी स्प्रॅट आमिरच्या प्रेमात का पडली?

बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आमिर खान(AAMIR KHAN) हा सध्या चांगलाच चर्चेत आहे. नुकताच त्याने त्याचा ६० वा वाढदिवस साजरा केला. यादरम्यानच त्याने त्याच्या वैयक्तिक आयुष्याबाबत मोठा खुलासा केला. ६० वर्षीय अभिनेता रिलेशनशिपमध्ये आहे. तो दीड वर्षापासून नात्यात असल्याचे त्याने म्हटले. तसेच ज्या मुलीला तो डेट करत आहे, तिची ओळखही करून दिली. गौरी असे तिचे नाव असून ते एकमेकांना गेल्या २५ वर्षांपासून ओळखत असल्याचे आमिर खानने स्पष्ट केले. गौरी स्प्रॅट ही मूळची बंगळूरूमधील असून सध्या ती आमिर खानच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये काम करत आहे. आता आमिर खानची गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटने मीडियाशी संवाद साधला. त्यावेळी तिने ती आमिर खानच्या का प्रेमात पडली, तिने आतापर्यंत आमिर खानचे किती सिनेमे पाहिले आहेत, यावर भाष्य केले. गौरीने आमिर खानचे किती चित्रपट पाहिले आहेत यावर बोलताना म्हटले की, 'लगान' व 'दिल चाहता है' हे दोनच सिनेमे मी पाहिले आहेत. पुढे गौरी आमिर खानबरोबरच्या रिलेशनशिपविषयी बोलताना म्हणाली, "प्रेमळ, काळजी घेणारा जेंटलमन पार्टनर किंवा जोडीदार मला हवा होता" गौरीने असे म्हणताच आमिर खानने तिला विचारले की, "त्यानंतर तू मला शोधलेस का?"

## 'हायवे'साठी आलियाने आधी दिला नकार

सध्याच्या काही आघाडीच्या बॉलीवूड अभिनेत्रींच्या यादीत आवर्जून येणारे नाव म्हणजे आलिया भट्ट (ALIA BHATT). आलियाने तिच्या आजवरच्या कारकिर्दीत अनेक हिट चित्रपट दिले आहेत. त्यापैकीच एक चित्रपट म्हणजे 'हायवे' (HIGHWAY). 'हायवे' हा चित्रपट आलिया भट्टच्या उत्तम चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटात वीरा त्रिपाठीच्या भूमिकेसाठी तिचं खूप कौतुक झालं होतं. या चित्रपटामुळेच ती केवळ उत्तम अभिनेत्री आहे हे सिद्ध झाले. पण, 'हायवे' हा चित्रपट करण्यास आलिया सुरुवातीला घाबरली होती? मग नंतर एका व्यक्तीमुळे तिनं यात काम करण्यास होकार दिला. चित्रपटाचे दिग्दर्शक इम्तियाज अली यांनी याबद्दल नुकतंच वक्तव्य केलं. 'गेम चेंजर्स'साठी कोमल नाहटा यांच्याशी झालेल्या संभाषणात इम्तियाज अली यांनी सांगितलं की, 'हायवे'साठी ते आधी अनुभवी अभिनेत्रीची निवड करण्याचा विचार करीत होते. या भूमिकेसाठी त्यांना तिशीच्या आसपास वय असलेल्या अभिनेत्रीची आवश्यकता आहे. पण १८ वर्षांच्या आलिया भट्टला भेटल्यानंतर त्यांना ती या भूमिकेसाठी परिपूर्ण असल्याचं जाणवलं. इम्तियाज अली यांनी सांगितले, "आलिया तेव्हा १८ वर्षांची असली तरीही तिच्यात पात्राला आवश्यक असलेली भावनिक खोली होती. तिनं तेव्हा जास्त काम केलं नव्हतं आणि मी तिचा 'स्टुडंट ऑफ द इयर' चित्रपटही पाहिला नव्हता; पण ती ज्या पद्धतीनं बोलली, ते खूप आकर्षक होतं. तिच्यात एक गुण होता, जो या चित्रपटासाठी उत्कृष्ट होता. तिच्या याच गुणानं मला खात्री पटवून दिली की, ती या भूमिकेसाठी योग्य आहे."इम्तियाज अली यांनी पुढे सांगितलं की, "महेश भट्ट यांनी 'हायवे' चित्रपटात काम करण्यास आलियाला तयार करण्याची महत्त्वाची भूमिका बजावली होती. मी तिच्या घरी जायचो आणि भट्टसाहेब तिला हे काम करण्यासाठी पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. सुरुवातीला ती थोडी घाबरली होती, तिला शंका होती की, ती हे काम करू शकेल की नाही. कारण- हा चित्रपट सोपा नव्हता. पण नंतर तिनं होकार दिलाच."दरम्यान, आलिया भट्टच्या आगामी कामाबद्दल बोलायचं झालं तर, तिचा आगामी चित्रपट 'अल्फा' आहे.



## सलमानच्या फार्महाऊसवर घालवलेले 3 दिवस

कन्नड अभिनेता किच्चा सुदीपची मुलगी सान्वीने 'दबंग ३' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यानच्या भाईजानबरोबरच्या आठवणी सांगितल्या आहे. किच्चा सुदीपने 'दबंग ३'मध्ये खलनायकाची भूमिका केली होती. सिनेमाचं शूटिंग सुरू होतं तेव्हा सान्वी १५ वर्षांची होती. ती सलमानची खूप मोठी चाहती होती, त्यामुळे तिच्या वडिलांबरोबर शूटिंगला आली होती. सलमानबद्दल गैरसमज आहेत, तो खूप चांगला आहे, असं सान्वी म्हणाली. 'दबंग ३' सिनेमा २०१९ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाच्या शूटिंगसाठी वडिलांबरोबर मुंबईत आलेल्या सान्वीचे सलमान खानने खूप लाड केले होते.जिनल मोदीला दिलेल्या एका मुलाखतीत बोलताना २१ वर्षीय सान्वीने सिनेमाच्या शूटिंगच्या आठवणी सांगितल्या. "जेव्हा पप्पा 'दबंग ३' चित्रपटाचे शूटिंग करत होते, ते माझ्या आयुष्यातील सर्वात मजेदार दिवस होते. मी लहानपणी सलमान खान यांच्यासाठी एक ब्रेसलेट बनवले होते आणि त्यांनी ते बिग बॉसमध्येही घातले होते. त्यामुळे 'दबंग ३' दरम्यान भेटल्यावर ती आठवण ताजी झाली," असं सान्वी म्हणाली.सान्वीने सांगितलं की शूटिंगनंतर तिचे वडील तिला मुंबईला घेऊन गेले आणि ते सलमानच्या घरी जेवायला गेले. सलमानच्या घरी जाणं हे सान्वीला तिच्या वडिलांनी दिलेलं सरप्राइज होतं. "मी त्यांना पाहिलं आणि मी विचार करत होते की अरे देवा, हे तर सलमान सर आहेत. त्या दिवशी त्यांनी माझे खूप लाड केले. त्यांनी मला गाणं गाण्यास सांगितलं. मग मी त्यांच्यासाठी गाणं गायलं," असं सान्वी म्हणाली.त्यांनी पहाटे ३ वाजता एका संगीत दिग्दर्शकाला फोन केला आणि मी हिला तुझ्याकडे पाठवत आहे असं सांगितलं. ते म्हणाले की हिचा आवाज रेकॉर्ड करून ठेव, जर एखाद्या कामासाठी आपल्याला तिच्या आवाजाची गरज भासली तर आपण वापरू. नंतर दुसऱ्या दिवशी मी त्या संगीत दिग्दर्शकाकडे गेले.



## दीपिका पादुकोणच्या लूकने वेधले लक्ष

बॉलीवूडमधील आघाडीची अभिनेत्री म्हणून दीपिका पादुकोण (DEEPIKA PADUKONE)ची ओळख आहे. दीपिका पादुकोणने २००७ साली 'ओम शांती ओम' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. शाहरुख खानबरोबरचा हा चित्रपट चांगलाच गाजल्याचे पाहायला मिळाले. या चित्रपटाचे दिग्दर्शन फराह खानने केले होते. त्याआधी अभिनेत्रीने २००६ साली कन्नड चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते. 'ऐश्वर्या' असे या चित्रपटाचे नाव होते. अभिनेत्रीने 'यह जवानी है दिवानी', 'चेन्नई एक्स्प्रेस', 'कॉकटेल', 'हॅपी न्यू इयर', 'खेलें हम जी जान से', 'देसी बॉइज', 'लव्ह आज कल' ते 'ब्रह्मास्त्र', 'जवान', 'पठाण', 'सिंघम अगेन', 'फायटर' अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांत अभिनेत्री प्रमुख भूमिकेत दिसली होती. तर, दीपिकाचा पती व अभिनेता रणवीर सिंग हादेखील चर्चेत असणारा अभिनेता आहे. 'लुटेरा', 'राम लीला', 'बाजीराव मस्तानी', 'बेफिकरे', 'गुंडे', 'दिल धडकने दो', 'पद्मावत', 'सिम्बा', 'गली बॉय', 'सिंघम अगेन', अशा चित्रपटांसाठी तो ओळखला जातो. रणवीर सिंह त्याच्या उत्साहाने नेहमीच सर्वांचे लक्ष वेधून घेतो. तसेच त्यांची अतरंगी कपड्यांची स्टाईल प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत असतात. आता सोशल मीडियावर या सेलिब्रिटी जोडप्याचा एक व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे.

**माफी मागावी** — धार्मिक भावना दुखावल्याचा करण्यात आला आरोप

# रिंकूवर होणार 'हनुमाना'चा कोप?

## रिंकू सिंगविरुद्ध लेखी तक्रार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यात नुकतीच तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका संपली असून या मालिकेत न्यूझीलंडने २-१ असा विजय मिळवला आहे. या दोन देशात २१ तारेखपासून पाच टी २० सामन्यांची मालिका सुरू होणार आहे. या मालिकेत रिंकू सिंग टीम इंडियाचा भाग आहे. या मालिकेपूर्वीच रिंकू सिंगच्या अडचणी वाढताना दिसत आहे. दीर्घकाळानंतर भारतीय संघात परतलेल्या रिंकू सिंग त्याच्या एका सोशल मीडिया रीलमुळे वादात सापडला आहे. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या रीलमुळे त्याच्याविरुद्ध तक्रार देखील दाखल केली गेली आहे.**




भारताचा स्फोटक फलंदाज रिंकू सिंगकडून अलीकडेच सोशल मीडियावर एक रील शेअर करण्यात आला आहे. या रीलमध्ये तो त्याच्या क्रिकेट यशाचे श्रेय देवाला देताना दिसत असून व्हिडिओमध्ये भगवान हनुमान, भगवान विष्णू, भगवान शिव आणि भगवान गणेश कारमध्ये चष्मा घालताना दिसत आहेत. रिंकू सिंगने षटकार मारतानाचे दृश्ये देखील संपूर्ण रीलमध्ये छेडले गेले आहेत. हा संपूर्ण व्हिडिओ एआय तंत्रज्ञान वापरून बनवण्यात आला होता. तथापि, हीच रील आता त्याच्यासाठी वादाचे कारण बनले आहे. रिंकू सिंगने शेअर केलेल्या या रीलवर सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काही चाहते रिंकू सिंगला पाठिंबा देखील देताना दिसत आहेत. याला श्रद्धा आणि श्रद्धेचा विषय म्हणत आहेत, तर काही आक्षेप घेण्यात येत आहेत. निषेध करणाऱ्यांचे मत आहे की, अशा प्रकारे देवतांचे चित्रण केल्याने धार्मिक भावना दुखावल्या जात आहेत. यासंदर्भात, करणी सेनेकडून अलीगडमधील सासनी गेट पोलिस स्टेशनमध्ये रिंकू सिंगविरुद्ध लेखी तक्रार देखील दाखल करण्यात आली आहे.करणी सेनेचे म्हणणे आहे की रिंकू सिंगने शेअर केलेली रील आक्षेपार्ह असून त्याच्यावर कारवाई करण्यात यावी. एक जबाबदार खेळाडू म्हणून रिंकू सिंगने या प्रकरणाबद्दल जाहीरपणे माफी देखील मागावी असे संघटनेचे म्हणणे आहे. या तक्रारीनंतर, प्रकरण वाढले आहे. क्रिकेटबद्दल सांगायचे झाले तर, रिंकू सिंगने अलीकडेच विजय हजारे ट्रॉफीमध्ये उत्तर प्रदेश संघाचे नेतृत्व केले आहे. त्याने आपला संघ उपांत्यपूर्व फेरीत पोहोचवला होता. तथापि, सौराष्ट्र विरुद्धच्या दुसऱ्या क्वार्टर फायनलमध्ये उत्तर प्रदेशचा १७ धावांनी पराभव स्वीकारावा लागला आणि संघ स्पर्धेतून बाहेर पडला. तथापि, न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेपूर्वी हा वाद मिटतो का? हे बघणे महतावचे ठरणार आहे.भारत आणि न्यूझीलंड यांच्यात नुकतीच तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका संपली असून या मालिकेत न्यूझीलंडने २-१ असा विजय मिळवला आहे. या दोन देशात २१ तारेखपासून पाच टी २० सामन्यांची मालिका सुरू होणार आहे. या मालिकेत रिंकू सिंग टीम इंडियाचा भाग आहे. या मालिकेपूर्वीच रिंकू सिंगच्या अडचणी वाढताना दिसत आहे. दीर्घकाळानंतर भारतीय संघात परतलेल्या रिंकू सिंग त्याच्या एका सोशल मीडिया रीलमुळे वादात सापडला आहे. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या रीलमुळे त्याच्याविरुद्ध तक्रार देखील दाखल केली गेली आहे. भारताचा स्फोटक फलंदाज रिंकू सिंगकडून अलीकडेच सोशल मीडियावर एक रील शेअर करण्यात आला आहे. या रीलमध्ये तो त्याच्या क्रिकेट यशाचे श्रेय देवाला देताना दिसत असून व्हिडिओमध्ये भगवान हनुमान, भगवान विष्णू, भगवान शिव आणि भगवान गणेश कारमध्ये चष्मा घालताना दिसत आहेत. रिंकू सिंगने षटकार मारतानाचे दृश्ये देखील संपूर्ण रीलमध्ये छेडले गेले आहेत. हा संपूर्ण व्हिडिओ एआय तंत्रज्ञान वापरून बनवण्यात आला होता. तथापि, हीच रील आता त्याच्यासाठी वादाचे कारण बनले आहे. रिंकू सिंगने शेअर केलेल्या या रीलवर सोशल मीडियावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काही चाहते रिंकू सिंगला पाठिंबा देखील देताना दिसत आहेत.

### नेमका वाद काय?

काही आक्षेप घेण्यात येत आहेत. निषेध करणाऱ्यांचे मत आहे की, अशा प्रकारे देवतांचे चित्रण केल्याने धार्मिक भावना दुखावल्या जात आहेत. यासंदर्भात, करणी सेनेकडून अलीगडमधील सासनी गेट पोलिस स्टेशनमध्ये रिंकू सिंगविरुद्ध लेखी तक्रार देखील दाखल करण्यात आली आहे.करणी सेनेचे म्हणणे आहे की रिंकू सिंगने शेअर केलेली रील आक्षेपार्ह असून त्याच्यावर कारवाई करण्यात यावी. एक जबाबदार खेळाडू म्हणून रिंकू सिंगने या प्रकरणाबद्दल जाहीरपणे माफी देखील मागावी असे संघटनेचे म्हणणे आहे.

# बांग्लादेशमध्ये रमीझ राजाचा पोपट

## रवी शास्त्रींच्या शैलीची नक्कल करणे पडले महागात!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेश प्रीमियर लीगमध्ये झालेल्या वादानंतर आता पुन्हा ही स्पर्धा सुरू झाली आहे. भारतामध्ये रवी शआस्त्री त्याचबरोबर मुरली कार्तिक सारखे कमालीचे माजी खेळाडू सध्या आयसीसीसाठी प्रेझेंटर म्हणून काम करतात. तर दुसरीकडे पाकिस्तानी खेळाडूंना आजकाल जगभरात प्रचंड अपमान सहन करावा लागत आहे. पाकिस्तानच्या अनेक खेळाडूंचे सोशल मिडियावर अनेक व्हिडिओ वाऱ्यासारखे व्हायरल होत आहेत.**




बिग बॅश लीगमध्ये, मोहम्मद रिझवानला मिडफिल्डमधून निवृत्त झाल्यानंतर ड्रेसिंग रूममध्ये बोलावण्यात आले होते, तर स्टीव्ह स्मिथने बाबर आझमला धाव घेण्यास परवानगी देण्यास नकार दिला होता. आता, बांगलादेशच्या भूमीवर माजी पीसीबी अध्यक्ष रमीझ राजा यांचा गंभीर अपमान करण्यात आला आहे. बांगलादेश प्रीमियर लीग दरम्यान रमीझ रवी शास्त्रींच्या शैलीची नक्कल करण्याचा प्रयत्न करत होता, पण प्रेक्षकांनी रमीझचा असा अपमान केला की तो कदाचित बराच काळ विसरू शकणार नाही. खरंतर, बांगलादेश प्रीमियर लीग सामन्यादरम्यान रमीझ राजा प्रस्तुतकर्ता म्हणून काम करत होता. टॉस दरम्यान, त्याने ढाक्यातील प्रेक्षकांना जल्लोष करण्यास प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला. त्याने स्टँडमधील चाहत्यांना जल्लोष करण्यास सांगितले. तथापि, स्टँडमधील प्रेक्षकांनी त्याच्या आवाहनाला प्रतिसाद दिला नाही, ज्यामुळे माजी पाकिस्तानी खेळाडू पूर्णपणे अस्वस्थ झाला. हा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की सध्या बांगलादेश क्रिकेट बोर्ड आणि खेळाडूंमध्ये तणाव सुरू आहे. बांगलादेशी खेळाडूंनी अलीकडेच स्पर्धेत खेळण्यास नकार दिला.

### पाकिस्तानी खेळाडूंचाही अपमान

जोपर्यंत बीसीबी संचालक नझमुल इस्लाम यांना त्यांच्या पदावरून काढून टाकले जात नाही तोपर्यंत ते लीगमध्ये सहभागी होणार नाहीत. यानंतर, बोर्डाने खेळाडूंच्या मागण्या मान्य केल्या आणि नझमुल इस्लाम यांना तात्काळ निलंबित केले.केवळ रमीज राजाच नाही तर पाकिस्तान संघातील सध्याच्या खेळाडूंनाही जगभरात मोठ्या प्रमाणात अपमान सहन करावा लागत आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। मंगळवार ।
दि. 20 जानेवारी 2026

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## 101 विद्यार्थी व 20 प्राध्यापकांचा सहभाग

# MIT महाविद्यालयात 'IPR Basics for Innovators and Entrepreneurs' कार्यशाळा उत्साहात संपन्न!

### बौद्धिक संपदा हक्कांवर तज्ज्ञांचे सखोल मार्गदर्शन

। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज

**MIT कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या INSTITUTION'S INNOVATION COUNCIL (IIC) आणि RESEARCH & DEVELOPMENT CELL यांच्या संयुक्त विद्यमाने "IPR BASICS FOR INNOVATORS AND ENTREPRENEURS" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले. नवोन्मेष, संशोधन आणि उद्योजकतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या बौद्धिक संपदा हक्कांबाबत (IPR) मार्गदर्शन करणारी ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांसाठीही मार्गदर्शक ठरली. या उपक्रमास १०१ विद्यार्थी आणि २० प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.**



कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफरे, उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी, IIC संयोजक डॉ. संदीप ढवळे, IIC–IPR समन्वयक डॉ. शीतल घोटेकर, R&D विभागाच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली खेरडेकर तसेच IIC उपाध्यक्ष प्रा. अभिजित नेटके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी संशोधन व नवकल्पनांकडे केवळ शैक्षणिक नव्हे तर उद्योजकीय दृष्टीनेही पाहावे, असे आवाहन केले.

या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक श्री. कुणाल आर. सरपाल (DIRECTOR OF STRATEGY & GROWTH – RIBIN तसेच FOUNDER & MANAGING PARTNER – WHITE COLLAR LEGAL LLP) यांनी IPR संदर्भातील मूलभूत संकल्पना, कायदेशीर बाबी आणि स्टार्टअप व उद्योजकतेमध्ये IPR ची भूमिका यावर सखोल मार्गदर्शन केले. कॉर्पोरेट व IPR कायद्याचे तज्ज्ञ, TEDX वक्ते, नामांकित संस्थांमध्ये अतिथी प्राध्यापक तसेच स्टार्टअप मार्गदर्शक म्हणून त्यांचा प्रदीर्घ अनुभव असून, त्या अनुभवाच्या आधारे त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणे, केस स्टडीज आणि वास्तवातील घटनांच्या माध्यमातून विषय उलगडून सांगितला.

बौद्धिक संपदा हक्क म्हणजे केवळ पेटंट किंवा ट्रेडमार्कपुरते मर्यादित नसून, संशोधनातून निर्माण होणाऱ्या कल्पना, डिझाइन, सॉफ्टवेअर, ब्रँड व्हॅल्यू यांचे संरक्षण किती महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला. "योग्य वेळी IPR संरक्षण न घेतल्यास नावीन्यपूर्ण कल्पनांवर इतरांचा हक्क निर्माण होऊ शकतो," असा इशाराही त्यांनी दिला. स्टार्टअप सुरू करताना किंवा संशोधनाचे व्यावसायीकरण करताना कोणत्या टप्प्यावर कोणत्या प्रकारचे IPR आवश्यक असते, याची सविस्तर माहिती त्यांनी दिली. या कार्यशाळेमुळे सहभागी विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये नवकल्पना, संशोधनातील नैतिकता, तसेच उद्योजकीय विचारसरणीबाबत जागरूकता निर्माण झाली. सर्जनशील कल्पनांचे संरक्षण कसे करावे, जबाबदार संशोधन आणि उद्योगस्नेही दृष्टिकोन कसा विकसित करावा, याबाबत मार्गदर्शन मिळाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल IIC व R&D सेलचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले असून, भविष्यातही अशा उपयुक्त आणि मार्गदर्शक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने स्पष्ट केले.

## GDG ON CAMPUS MIT ACSC तर्फे 'AI & ML SIMPLIFIED'

### शिक्षण विश्व : विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भविष्याकडे नेणारा ज्ञानप्रवास

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**GDG ON CAMPUS MIT ACSC यांच्या वतीने "AI & ML SIMPLIFIED: LEARN, BUILD, INNOVATE" या विषयावर शनिवार, दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी CLASSROOM २०२ येथे एकदिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**



या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (ARTIFICIAL INTELLIGENCE – AI) व मशीन लर्निंग (MACHINE LEARNING – ML) या आधुनिक व उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या मूलभूत संकल्पना सोप्या व समजण्याजोग्या पद्धतीने समजावून देणे हा होता. तसेच या तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष जीवनातील उपयोग, उद्योगक्षेत्रातील करिअर संधी आणि नवोपक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे हेही कार्यशाळेचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. कार्यशाळेसाठी विविध विभागांतील एकूण १६० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ८० विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा सहभाग उत्स्फूर्त असून सत्रादरम्यान त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

एड्युनेट फाउंडेशन, पुणे येथील कॉर्पोरेट ट्रेनर श्री. सार्थक नार्नोर यांनी RESOURCE PERSON म्हणून कार्यशाळेला मार्गदर्शन केले. त्यांनी AI व ML मधील क्लिष्ट संकल्पना अत्यंत सोप्या, प्रभावी व उदाहरणांसह स्पष्ट केल्या. उद्योगातील त्यांच्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील करिअर संधी, भविष्यातील ट्रेंड्स तसेच या तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व समजण्यास मोलाची मदत झाली.

ही कार्यशाळा डॉ. हर्षा पाटील व प्रा. अश्विनी सातकर यांच्या समन्वयाने यशस्वीरीत्या पार पडली. त्यांना डॉ. सुप्रिया लोंढे, डॉ. माधुरी दरेकर, श्री. सम्मेद बुकशेटे व प्रा. मनीषा पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# Making Math Fun and Fear-Free: A Creative Classroom Initiative by Ms. Rajpreet Kaur

## A joyful and creative approach that inspires young learners to enjoy mathematics through puzzles, real-life examples, and a positive mindset

**Moshi (Pune) : Learning mathematics no longer needs to be intimidating or dull. Proving this through creativity and child-friendly innovation, Ms. Rajpreet Kaur, a Primary Teacher at Priyadarshani School, Moshi, has introduced an engaging and joyful approach to help young learners connect with mathematics in a meaningful way.**



She begins with a simple yet intriguing brain-teaser: "I am an odd number. Take away one letter and I become even. What number am I?" This riddle instantly sparks curiosity and encourages students to think beyond numbers, blending language skills with logical reasoning. The answer — SEVEN (remove 'S' and it becomes 'EVEN') — leaves children delighted and eager to learn more.

Through her thoughtfully designed content, Ms. Kaur emphasizes that math is already a part of children's everyday lives. Whether sharing cookies equally, counting steps to the playground, or reading the clock for lunchtime, children are unknowingly practicing mathematical thinking. Her message is clear: math is not just a subject, it is a life skill.

Explaining math as a "secret tool in your pocket," she draws fascinating real-world connections — from honeybees building perfect hexagonal hives to video games calculating high scores. These examples help students understand that math exists far beyond textbooks and classrooms.

Ms. Kaur also shares three practical and child-friendly strategies to make math enjoyable:

**Use Your Toys:**

By using Lego bricks, marbles, or cereal pieces, abstract problems become tangible and easier to understand.

**Draw a Picture:**

Visualizing word problems through simple drawings helps children quickly grasp concepts and find solutions with confidence.

**The "Power of Yet":**

Encouraging a growth mindset, she reminds students that mistakes are part of learning — you just haven't mastered it yet.

Adding humor to learning, Ms. Kaur includes a light-hearted math poem that brings smiles to young faces and reduces fear around the subject. Her teaching philosophy reinforces that the brain is like a muscle — the more it is used, the stronger it becomes.

This innovative and positive approach reflects Ms. Rajpreet Kaur's dedication to nurturing curiosity, confidence, and critical thinking among primary students. Her efforts highlight how creative teaching can transform mathematics from a feared subject into an exciting adventure.

Such initiatives not only strengthen foundational learning but also inspire students to enjoy the journey of discovery — one puzzle, one smile, and one number at a time.

---

### नगरसेविका होणाऱ्या वाकडकरांचा पहिल्या सदस्या

# ती राम वाकडकर यांनी रचला इतिहास!

## प्रभाग क्रमांक 25 मधून प्रचंड मताधिक्याने दणदणीत विजय

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूकीत प्रभाग क्रमांक २५ मधून भाजपाच्या उमेदवार श्रुती राम वाकडकर यांनी दणदणीत विजय मिळवत नवीन अध्याय रचला आहे. आहे.**




आजवरच्या इतिहासात वाकडच्या प्रतिष्ठित वाकडकर कुटंबियांना त्यांच्या रुपाने प्रथमच प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे. वाकडकर घराण्यातील पहिल्या-वहिल्या नगरसेविका म्हणून श्रुती वाकडकर सभागृहात जाणार असल्याने वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसरात विजयोत्सव सुरु आहे.

राहुल कलाटे यांच्या नेतृत्वात श्रुती राम वाकडकर, रेश्मा चेतन भुजबळ, कुणाल वाव्हळकर ह्या पॅनलच्या विजयामुळे ठिकठिकाणी फटाके फोडून, ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष साजरा करण्यात आला.

श्रुती वाकडकर यांनी क गटातून मुळशीचे माजी सभापती रमण पवार व माजी नगरसेविका यमुना पवार यांच्या स्नुषा तसेच उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते संदीप पवार यांच्या पत्नी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवार चित्रा संदीप पवार यांचा तब्बल ११०२३ मतांनी दणदणीत पराभव केला. त्यांना २१८३७ इतकी भरघोस मते मिळाली.

श्रुती वाकडकर यांनी प्रचारादरम्यान स्थानिक प्रश्नांवर केंद्रित, सकारात्मक व विकासाभिमुख अजेंडा मांडत मतदारांशी थेट संवाद साधला. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य सुविधा, महिला-सशक्तीकरण, युवकांसाठी क्रीडांगणे व उद्याने, तसेच मूलभूत नागरी सुविधांचा सर्वांगीण विकास हे त्यांच्या प्रचाराचे प्रमुख मुद्दे होते. त्यामुळे त्यांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

> "हा विजय माझा वैयक्तिक नसून प्रभाग क्रमांक २५ मधील प्रत्येक मतदाराचा आहे. दिलेल्या विश्वासाला न्याय देत प्रभागाचा सर्वांगीण विकास, पारदर्शक कारभार आणि नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन." या निकालामुळे प्रभाग क्रमांक २५ मध्ये भाजपाची पकड अधिक मजबूत झाली असून आगामी काळात या परिसराच्या विकासाला नवे बळ मिळेल.
>
> **-श्रुती राम वाकडकर,**

या विजयामागे आमदार शंकर जगताप, शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे पॅनल प्रमुख राहुल कलाटे, भाजपा वरिष्ठ शहर उपाध्यक्ष राम वाकडकर यांचे प्रभावी मार्गदर्शन, तसेच भाजपाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी केलेली मेहनत, घराघरात पोहोचलेला प्रचार आणि संघटित ताकद महत्त्वाची ठरली. विशेषतः महिला मतदारांचा मोठा पाठिंबा सौ. वाकडकर यांना मिळाल्याचे मतमोजणीच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले. त्यामुळे निवडणूक प्रचारादरम्यान या पॅनलने दिलेल्या वचननाम्याची पूर्तता नक्की होईल अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## College of Pharmacy
## Saswad, Pune - 412301
### D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

**Your Trusted Facilitation Centre!**

**FC Code 6372**

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

## "Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046